**शिवकालीन पाणी साठवण योजना -**
**स्वतंत्र बचत बँक खाते उघडण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक ग्रापापु १००७/प्र.क्र.२४४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ३० जानेवारी २००८**

वाचा: १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्रमांक ग्रापापु १००१/प्र.क्र.३३०/पापु ०७, दिनांक १४ फेब्रुवारी २००२
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्रमांक ग्रापापु १००३/प्र.क्र.९५/पापु-०७, दिनांक ६ मे २००३

**प्रस्तावना:**

पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्याची उपलब्धता वाढविणे व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करणे यासाठी पावसाच्या पाण्याचा उपयोग करुन शिवकालीन पाणी साठवण योजना राज्यामध्ये राबविण्यास संदर्भातील क्रमांक १ येथील दिनांक १४.२.२००२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेसाठी जिल्हा परिषदांना मिळणारा निधी जमा करण्यासाठी जिल्हा स्तरावर स्वतंत्र बँक खाते (राष्ट्रीयीकृत अथवा सहकारी बँकेत) उघडण्यास सदंर्भातील क्रमांक २ येथील दिनांक ६ मे २००३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार काही जिल्हा परिषदांनी त्यांना मिळालेला निधी बँकेमध्ये चालु खात्यात ठेवल्याने त्यावर व्याज प्राप्त न झाल्याची बाब महालेखापाल, नागपूर यांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

**शासन शुध्दीपत्रक:**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन संदर्भातील क्रमांक २ येथील शासन निर्णयाच्या परिच्छेद १ मधील शिवकालीन पाणी साठवण योजनेसाठी जिल्हा परिषदांना प्राप्त होणा-या निधीकरीता जिल्हा स्तरावर स्वतंत्र बँक खाते (राष्ट्रीयीकृत अथवा सहकारी बँकेत) उघडण्यास शासन परवानगी देत आहे या वाक्याऐवजी शिवकालीन पाणी साठवण योजनेसाठी जिल्हा परिषदांना प्राप्त होणा-या निधीकरीता **जिल्हा स्तरावर स्वतंत्र बचत बँक खाते राष्ट्रीयीकृत बँकेत उघडण्यास शासन परवानगी देत आहे असे वाचावे.**

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२१११३५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(श्री. श्री. घोलप)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव

२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव

३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक

४) विभागीय आयुक्त (सर्व)

५) सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई

६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

७) जिल्हाधिकारी (सर्व)

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

१०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

११) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पहिला मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई

१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)

१३) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)

१४)उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)

१५)उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)

१६) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)

१७)अवर सचिव, कार्यासन पापु-०४, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

१८)पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व नियंत्रण अधिकारी व कार्यासन अधिकारी

१९) संगणक कक्ष

२०)निवडनस्ती (पापु-०७)